महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id :mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/२७०३
दिनांक : २३/०७/२०२०

# आदेश

**विषय :-** कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण-पुणे महापालिका क्षेत्रासाठी सुधारित आदेश

**संदर्भ :-** १) कोविड-१९,प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरिता लॉकडाऊन टप्याटप्याने उठविणे बाबतचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दि.२९.०७.२०२०

२) अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई, क्र.करोना २०२०/प्र.क्र५८/ आरोग्य ५, दि.१४ मार्च २०२०

३) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

४) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

५) मा.आयुक्त, पुणे महापालिका यांचे आदेश, जा.क्र.मआ/साप्रवि/१२९४,दि.०२.०६.२०२०

६) मा.आयुक्त, पुणे महापालिका यांचे आदेश, जा.क्र.मआ/साप्रवि/१४४२,दि.०४.०६.२०२०

७) मा.आयुक्त, पुणे महापालिका यांचे आदेश, जा.क्र.मआ/साप्रवि/१९६७,दि.२६.०६.२०२०

ज्याअर्थी राज्य शासनाने संदर्भ क्र. १ स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन महानगरपालिका आयुक्तांस साथरोगाच्या फैलावास प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक क्षेत्रामध्ये काही उपाययोजनांची अंमलबजावणी करता येईल आणि परवानगी दिलेली बिगर अत्यावश्यक कार्ये व नागरिकांच्या संचार करण्यावर आवश्यक ते निर्बंध घालता येतील.

त्याअनुषंगाने **मी, विक्रम कुमार , आयुक्त, पुणे महानगरपालिका, मला भारतीय साथ रोग अधिनियमानुसार प्राप्त झालेल्या अधिकारान्वये खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गत करीत आहे.**

**अ) नागरिकांच्या सुरक्षितते संबंधीचे उपाय :**

१) केंद्र शासनाच्या कोविड-१९ च्या नियंत्रणाच्या अनुषंगाने निर्गत केलेल्या निर्देश लागू राहतील.

२) महानगरपलिका हद्दीमध्ये कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक कारण/ सेवा वगळता रात्री ०९.०० ते सकाळी ०५.०० वाजेपर्यंत घराबाहेर जाता येणार नाही.

३) ६५ वयोगटा पेक्षा अधिक वय असलेल्या, आजारी व्यक्ती, गरोदर महिला, १०वर्षापेक्षा कमी वय असलेली मुले यांना अत्यावश्यक सेवा आणि आरोग्य विषयक अडचणी शिवाय घराबाहेर जाता येणार नाही.

सदरचे आदेश दि. २४ जुलै २०२० पासून ते पुढील आदेशापर्यंत, पुणे महापलिका हद्दी मधील सोबत जोडलेल्या अनुसूची-१ मधील **सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र** (Micro Containment Zone) हे संक्रमणशील क्षेत्र म्हणून जाहीर करीत आहे. अशा क्षेत्रात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

- **प्रतिबंधित क्षेत्रात** विशिष्ठ क्षेत्र , विशिष्ठ गल्ली/चाळ/वसाहत, विशिष्ठ इमारती/गृह निर्माण सोसायटी येथे पॉझीटीव्ह रुग्णांची संख्या आढळल्यास त्या कार्यक्षेत्राचे सहायक आयुक्त,सनियंत्रण अधिकारी(Incident Commander) म्हणून असे विशिष्ठ क्षेत्र , विशिष्ठ इमारती/गृह निर्माण सोसायटी लगेच सील करतील .
- **तसेच प्रतिबंधित क्षेत्राबाहेर** विशिष्ठ क्षेत्र , विशिष्ठ गल्ली/चाळ/वसाहत,विशिष्ठ इमारती/गृह निर्माण सोसायटी येथे पॉझीटीव्ह रुग्णांची संख्या आढळल्यास त्या कार्यक्षेत्राचे सहायक आयुक्त,सनियंत्रण अधिकारी(Incident Commander) म्हणून असे विशिष्ठ क्षेत्र , विशिष्ठ इमारती/गृह निर्माण सोसायटी लगेच सील करतील.

**ब) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone)**

१) संबंधित पोलीस स्टेशन प्रमुख सोबतच्या अनुसूची-१ मधील क्षेत्राच्या हद्दी प्रतिबंधित (सील) करतील.

२) त्यानुसार महापालिकेच्या हद्दीमध्ये वैद्यकीय/आपत्कालीन सेवा व जीवनावश्यक वस्तूंच्या सेवा व पुरवठा सुरळीत राहण्याकरिता, या सेवा वगळता/ पुरवठा वगळता अन्य व्यक्ती यांना संबंधित प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) मध्ये प्रवेश करण्यास व परिसरातून बाहेर पडण्यास बंदी करण्यात येत आहे.

३) अ) प्रतिबंधित क्षेत्रामध्ये (Containment Zone) मध्ये दुध आणि भाजीपाला तसेच इतर अत्यावश्यक वस्तूचा पुरवठा जसे स्वयंपाकाचा गॅस, इ. जीवनावश्यक वस्तु /

औषध विक्रीची दुकाने / अत्यावश्यक सेवा पुरविणारे कार्यालय / व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना यामधून वगळण्यात येत आहे.

ब) मनपाची अत्यावश्यक सेवा देणारी सर्व प्रकारची वाहने जसे पाण्याचे टँकर, रुग्णवाहिका, शववाहिका, अग्निशमन दलाचे वाहन, कचरा वाहतूक गाडी व त्यावरील कर्मचारी, अत्यावश्यक सेवा देणारे कर्मचारी / अधिकारी यांना प्रतिबंधात क्षेत्रामध्ये केव्हाही प्रवेश करता येईल. त्याकरिता कोणत्याही पासची आवश्यकता राहणार नाही.

४) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) जाहीर केलेल्या क्षेत्रामध्ये अत्यावश्यक सेवा/वस्तू विक्री / सेवा करण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपद्धती असेल.
प्रतिबंधित क्षेत्रात अत्यावश्यक वस्तूंची दुकाने (किराणा दुकान, भाजीपाला विक्री, औषध विक्री, दवाखाने, दुध विक्री, रेशन दुकाने, इ.) सकाळी ०९.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत उघडी राहतील.

क) प्रतिबंधित क्षेत्राबाहेर ( Outside Containment Zone)

i. **घराबाहेरील व्यायाम :** वैयक्तिक व्यायाम जसे सायकलींग, जॉगिंग, धावणे, चालणे या बाबी सार्वजनिक मोकळ्या जागा जसे खाजगी/सार्वजनिक मैदाने , पुणे महापालिकेची मैदाने/सोसायटीची मैदाने, या ठिकाणी खालील अटींच्या अधीन राहून करता येईल. मात्र कोणतीही क्रिया क्रीडांगणाच्या बंदिस्त भागात केली जाणार नाही.मात्र या ठिकाणी कोणत्याही प्रकारची व्यायामाची उपकरणे/ओपन जिम ई.वापर करता येणार नाही.

- वरील नमूद सुविधा पहाटे ०५.०० ते संध्याकाळी ०७.०० पर्यंत वापरता येतील.
- वरील नमूद क्रिया या सामुदायिक स्वरूपात करता येणार नाही.तथापि मुलांच्या सोबत मोठी व्यक्ती असणे आवश्यक राहील.
- नागरिकांनी केवळ शारीरिक व्यायाम करण्याकरिता थोड्या वेळा करिताच घराच्या बाहेर जावे.
- वरील नमूद वैयक्तिक व्यायाम करण्या शिवाय अन्य कोणत्याही बाबी यांना परवानगी नसेल.
- नागरिकांनी केवळ आपल्या घराजवळील वरील नमूद मोकळया जागांचा वापर करावा.दूरच्या ठिकाणी वैयक्तिक व्यायाम करण्यासाठी त्यांना प्रवास करता येणार नाही.

- नागरिकांनी मोकळया मैदानात गर्दी करू नये असा त्यांना सल्ला देण्यात येत आहे. नागरिकांनी व्यायामाकरिता सायकलचा वापर करावा जेणे करून त्यांच्यात आपोआप सामाजिक सुरक्षित अंतर राहू शकेल.

ii. स्वयं रोजगार करणाऱ्या व्यक्ती जसे प्लंबर,विद्युत विषयक काम करणारे, पेस्ट कंट्रोल,आणि अन्य तांत्रिक स्वरूपाचे व्यवसाय करणारे व्यक्ती सामाजिक सुरक्षित अंतर, मास्क आणि सॅनिटायझर यांचा वापर करून काम करू शकतात.

iii. नागरिक आपले वाहने वाहन दुरुस्ती करणारे गॅरेज यांची पूर्व नियोजित वेळ निश्चित करून घेऊन जाऊ शकतात.

iv. शासकीय कार्यालय : सर्व शासकीय कार्यालयांमध्ये (आरोग्य व वैद्यकीय सेवा,अत्यावश्यक सेवा,कोषागार,आपत्ती व्यवस्थापन,पोलीस,राष्ट्रीय माहिती केंद्र, अन्न व नागरी पुरवठा, फुड कार्पोरेशन ऑफ इंडिया, नेहरू युवा केंद्र, महापालिका सेवा त्यांना आवश्यक असेल त्या कर्मचारी संख्या वर काम करतील) १५ % किंवा जास्तीत जास्त १५ कर्मचारी या पैकी जी संख्या जास्त असेल ती वापरून कार्यालये सुरु ठेवता येईल.

v. दुकानांबाबत

  - मॉल व व्यापारी संकुल वगळता सर्व व्यापारी क्षेत्रे, रस्त्यावरील दुकाने आळीपाळीने (P-1,P-2 पद्धतीने) मुख्य रस्त्याच्या एका बाजूची दुकाने सम दिनांकाच्या दिवशी व दुसऱ्या बाजूची दुकाने विषम दिनांकाच्या दिवशी पुढील नियमाप्रमाणे उघडतील. मुख्य रस्ता पूर्व-पश्चिम असल्यास दक्षिण बाजूकडील दुकाने सम दिनांकास तर उत्तर बाजूकडील दुकाने विषम दिनांकास आणि मुख्य रस्ता दक्षिण-उत्तर असल्यास रस्त्याच्या पूर्व बाजूकडील दुकाने सम दिनांकास तर पश्चिम बाजूकडील दुकाने विषम दिनांकास उघडी राहतील.
  - पुणे शहरातील मनपाच्या मंडई मधील सम क्रमांकाचे गाळे सम दिनांकास तर विषम क्रमांकाचे गाळे विषम दिनांकास उघडी राहतील.

**वर नमूद केलेले व्यवसाय हे सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०७.०० पर्यंत खालील अटींच्या अधीन राहून खुली राहतील.**

➢ दुकानामधील ट्रायल रूमचा वापर करता येणार नाही.त्याच प्रमाणे विक्री केलेले कपडे बदलून अथवा परत करता येणार नाही, जेणे करून संसर्गाचा प्रसार होणार नाही.

- दुकानामध्ये वस्तू खरेदीसाठी गर्दी होऊ नये व सुरक्षित अंतर राहावे याची जबाबदारी दुकानदाराची राहील.तसेच गर्दी होऊ नये म्हणून नागरिकांना उभे राहण्याच्या जागेवर ६ फुट अंतराच्या खुणा करणे,टोकन पद्धतीचा अवलंब करणे,किंवा साहित्याचा घरपोच पुरवठा करू शकतात.
- नागरिकांनी खरेदीसाठी दुकानामध्ये शक्यतोवर घराच्या जवळील दुकानामध्ये जावे. जात असताना शक्यतो पायी जावे किंवा सायकलचा वापर करावा. विगर अत्यावश्यक वस्तूच्या खरेदीसाठी लांबवर जाऊ नये.
- दुकानांमध्ये सामाजिक सुरक्षित अंतराचे नियम पाळले जात नाही असे प्रशासनाच्या लक्षात आल्यास तात्काळ सदरची दुकाने बंद केली जातील.

i. नागरिकांच्या **अत्यावश्यक सोयीसाठी** खालील प्रकारच्या वाहनांचा वापर करता येईल.

| वाहनाचा प्रकार | किती व्यक्ती वापरू शकतील |
|---|---|
| टॅक्सी / कॅब | अत्यावश्यक सेवा - वाहनचालक + २ |
| रिक्षा | अत्यावश्यक सेवा - वाहनचालक + २ |
| चारचाकी स्वयंचलित वाहन | अत्यावश्यक सेवा - वाहनचालक + २ |
| दुचाकी स्वयंचलित वाहन | अत्यावश्यक सेवा - केवळ वाहन चालविणारी व्यक्ती |

**ग) प्रतिबंधित क्षेत्राबाहेर ( Outside Containment Zone) दुकाने सुरु करताना घ्यावयाची दक्षता: सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे राहतील व याप्रमाणे दुकानदारांना दक्षता घेता येईल.**

i. व्यवसाय धारकाने दुकानाची वेळ निश्चित केल्याप्रमाणे म्हणजे सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०७.०० वाजेपर्यंत ठेवावी.
ii. व्यवसाय धारक आणि व्यवसायात काम करणारे कर्मचारी हे प्रतिबंधित क्षेत्राच्या बाहेरील भागात राहणारे असणे आवश्यक आहे.
iii. दुकानदारांनी कामगारांना फोटोसह ओळखपत्र द्यावे.
iv. दुकानामध्ये काम करताना दोन कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे.
v. दुकानात काम करण्याऱ्या सर्व व्यक्तींनी मास्क आणि हातमोजे (Hand gloves) वापरावे.

vi. दुकानात काम करण्याऱ्या कर्मचा-यांना कोणतीही आजाराची लक्षणे दिसल्यास तात्काळ मनपा दवाखान्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

vii. कर्मचा-यांना हात वेळोवेळी स्वच्छ धुण्यासाठी साबण/सॅनिटायझरची व्यवस्था करावी व आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून द्यावी.

viii. दुकानामध्ये शिरताना पायऱ्या आणि बाहेरील भाग १% सोडियम हायपो क्लोराइट द्रावणाने दररोज फवारणी करून घ्यावी.

ix. दुकानाचे काउंटर गिऱ्हाईक सोडून गेल्यानंतर १% सोडियम हायपो क्लोराइट द्रावणाने पुसून घ्यावी.

x. दुकानात खरेदी करण्यासाठी आलेल्या नागरिकाने देखील मास्क घालणे आवश्यक आहे.

xi. दुकानामध्ये वस्तू खरेदीसाठी गर्दी होऊ नये व सुरक्षित अंतर राहावे म्हणून नागरिकांना उभे राहण्याच्या जागेवर ६ फुट अंतराच्या खुणा करून ठेवाव्यात.

घ) सर्व खाजगी कार्यालये त्यांच्या कर्मचारी संख्येच्या १०% किंवा जास्तीत जास्त १० कर्मचारी पर्यंत वापरून कार्यालये सुरु ठेवू शकतील, उर्वरित कर्मचारी यांना घरी थांबवून काम करतील. सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयातील काम संपल्यानंतर घरी जाताना विशेष काळजी घ्यावी जेणेकरून कोरोनाचा संसर्ग लवकर होऊ शकणाऱ्या व्यक्ती, प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांना याचा संसर्ग होणार नाही याबाबत कर्मचा-यांचे उद्बोधन करावे.

**ङ) प्रतिबंधित बाबी : खालील नमूद सेवा / व्यवसाय / अन्य बाबी प्रतिबंधित राहतील.**

i. शाळा, महाविद्यालय, प्रशिक्षण वर्ग, विद्यार्थांच्या शिकवण्या, ई.

ii. सिनेमा हॉल, व्यायाम शाळा, पोहण्याचे तलाव, करमणुकीची ठिकाणे, नाट्यगृहे, या अनुषंगिक ठिकाणे.

iii. सामाजिक / राजकीय / क्रीडा / करमणूक / शैक्षणिक / सांस्कृतिक / धार्मिक कार्यक्रम आणि कोणतेही कारणाने होणारी मोठी गर्दी.

iv. सर्वसामान्य व्यक्तीसाठी असलेली धार्मिक स्थळे.

v. स्पा.

vi. मॉल, हॉटेल, उपाहारगृहे आणि अन्य आदरातिथ्य करणाऱ्या सेवा.

**च) सार्वजनिक ठिकाणी घ्यावयाची काळजी :**

i. सर्व नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी मास्क वापरणे आवश्यक आहे.

ii. सार्वजनिक ठिकाणांचे व्यवस्थापन ज्यांच्या नियंत्रणाखाली आहे अश्या व्यक्तींनी नागरिकांमध्ये सुरक्षित अंतर राहील याची दक्षता घ्यावी.

iii. कुठलीही संघटना/व्यवस्थापक सार्वजनिक ठिकाणी ५ किंवा अधिक व्यक्ती एकत्रित येऊ देणार नाहीत.

iv. लग्न समारंभासारख्या कार्यक्रमात जास्तीत जास्त २० पाहुणे/व्यक्ती एकत्र येऊ शकतात. मात्र या ठिकाणी देखील वावरताना सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक राहील.

v. अंत्यसंस्कार व अनुषंगिक कार्यक्रमास जास्तीत जास्त २० व्यक्ती एकत्र येऊ शकतात. मात्र या ठिकाणी देखील वावरताना सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक राहील.

vi. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे हा देखील दंडनीय अपराध आहे.

vii. पान, तंबाखू, मद्य, इ. चे सार्वजनिक ठिकाणी सेवन करता येणार नाही.

viii. मद्यविक्रीच्या दुकानात २ व्यक्तीमधील अंतर किमान ६ फुट इतके राहील. तर एकावेळी जास्तीत जास्त ५ व्यक्ती हजर राहू शकतील. यावर राज्य उत्पादन शुल्क विभाग यांची देखरेख राहील.

**छ) कामाच्या ठिकाणी घ्यावयाची काळजी :**

i. कामाच्या ठिकाणी सर्वांना मास्क उपलब्ध करून दिले पाहिजेत व ते सर्वांनी वापरणे आवश्यक आहे.

ii. कामाच्या ठिकाणी सुरक्षित अंतर सर्व कर्मचा-यांमध्ये राहणे आवश्यक आहे.

iii. कर्मचा-यांमध्ये सुरक्षित अंतर राहण्याच्या दृष्टीने कामाच्या २ शिफ्टमध्ये पुरसे अंतर व जेवणाच्या वेळा देखील निश्चित करून द्याव्यात .

iv. कामाच्या ठिकाणी येणाच्या व जाण्याच्या ठिकाणी त्यांचे शरीराचे तापमान घेण्यासाठी थर्मल स्कॅनिंग, हॅन्ड वॉश, सॅनिटायझर (स्पर्श विरहीत) ची व्यवस्था असावी तसेच कामाच्या ठिकाणी पुरेश्या प्रमाणात हॅन्ड वॉश व सॅनिटायझर उपलब्ध असावे, तसेच आठवड्यातून दोन वेळेला १% सोडियम हायपो क्लोराइट द्रावणाने फवारणी करून घ्यावी.

v. कामाच्या ठिकाणाची, सार्वजनिक वापरावयाच्या जागा आणि अन्य सर्व ठिकाणी ज्या भागाला व्यक्तीचा स्पर्श होतो. जसे दरवाजाची कडी, ई. याची स्वच्छता वारंवार होणे आवश्यक आहे.

vi. आरोग्य सेतू ॲप सर्व कर्मचा-यांनी वापरणे बंधनकारक करणे याची जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील.

vii. कर्मचा-यांच्या मोठ्या उपस्थिती असलेल्या बैठका घेण्यात येऊ नये.

viii. कामाच्या ठिकाणी कोविड-१९ वर उपचार होणाऱ्या मनपाच्या दवाखान्यांची यादी लावणे आवश्यक आहे.

ix. कोणत्याही कर्मचा-यास कोविडची लक्षणे दिसल्यास त्यास तात्काळ तपासणीसाठी नेण्यात यावे. वैद्यकीय तपासणीस घेऊन जाईपर्यंत अश्या कर्मचाऱ्यांस ठेवण्याकरिता स्वतंत्र जागा निश्चित करून ठेवावी.

x. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नसेल त्यावेळेस कर्मचा-यांच्या सुरक्षित अंतर ठेवून वाहतुकीसाठी वाहनाची व्यवस्था करावी.

xi. चांगल्या प्रकारची स्वच्छता कशाप्रकारे ठेवावी याबाबत कर्मचा-यांना प्रशिक्षण आणि सतत संपर्क ठेवला पाहिजे.

xii. काम करीत असलेल्या व्यक्ती या केवळ प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील (Outside Containment Zone) राहणाऱ्या असणे आवश्यक आहे.

**ज) यापूर्वीच्या आदेशान्वये सुरु करण्यात आलेले सेवा / व्यवसाय :**

१) **अत्यावश्यक व्यवसाय** : सर्व प्रकारचे दवाखाने, इस्पितळे, औषध विक्रीची दुकाने ; अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे व्यवसाय यात औषधी, वैद्यकीय उपकरणे व त्यांना लागणारा कच्चा माल, इ. ; तसेच ज्याठिकाणी वस्तूचे उत्पादन करणेसाठी कामामध्ये सातत्य ठेवावे लागते अशा बाबी ; माहिती व तंत्रज्ञान विषयक हार्डवेअरची निर्मिती तसेच पॅकिजिंग करिता लागणाऱ्या वस्तूंची निर्मिती, अन्न प्रक्रिया उद्योग जसे ब्रेड उत्पादक कारखाना, दुध प्रक्रिया केंद्र, पिठाची गिरणी, दालमिल या ठिकाणी कामगारांच्या कामाच्या वेळा निश्चित करून व त्यांच्या सुरक्षित अंतर ठेवून करता येऊ शकते.

२) यापूर्वी परवानगी दिलेल्या सर्व औद्योगिक आस्थापना, तसेच शेतमालाशी कृषि निगडीत प्रक्रिया उद्योग उक्त कालावधीत सुरू राहतील.

३) **घरकाम करणाऱ्या व्यक्ती** : प्रतिबंधित क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील ठिकाणी घरकाम करण्यास मनाई करण्यात येत आहे. प्रतिबंधित क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या घरी, घर मालकाची इच्छा असल्यास स्वच्छेने काम करता येईल.

४) **ज्येष्ठ नागरिक :** ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मदतीकरिता लागणाऱ्या व्यक्ती, रुग्णसेवेसाठी मदतनीस व्यक्ती, हेल्पर, घरकाम करणारी व्यक्ती, वाहनचालक, इ. यांची मदत घेता येईल.

५) **वर्तमानपत्रे :** वर्तमानपत्राचे वितरण हे वर्तमानपत्रे घेणाऱ्या व्यक्तीच्या सहमतीने वितरीत करता येतील. मात्र याकरिता वितरण करणाऱ्या व्यक्तीने मास्कचा वापर आणि वेळोवेळी सॅनिटायझरचा वापर करणे आवश्यक राहील. तसेच, इलेक्ट्रॉनिक मिडीया, केबल सर्व्हिस सुरु राहतील.

६) **वित्तीय क्षेत्र :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि त्यांनी नियंत्रित केलेल्या आर्थिक संस्था या कमीत कमी कर्मचारी वापरून कामकाज सुरु ठेवू शकतील. तर ATM, बँका, सहकारी पतसंस्था, विमा कंपन्या यांची कार्यालये सुरु राहतील.

७) **ई-कॉमर्स:** ई-कॉमर्सच्या माध्यमातून घरपोच वस्तूचे वितरण करता येईल. तसेच कुरिअर सेवा सुरु राहतील.

८) **माहिती तंत्रज्ञान व दूर संचार :** माहिती तंत्रज्ञान विषयक काम करणारे व सेवा देणारे व्यवसाय,दूरसंचार क्षेत्रात(शासकिय व खाजगी) काम करणारे त्यांच्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी ५०% कर्मचाऱ्यांवर सुरु ठेवता येतील तसेच डाटा व कॉल सेंटर कमीतकमी कर्मचाऱ्यांचा वापर करून सुरु ठेवता येतील.

९) **खाद्य पदार्थांची सेवा :** खाद्य पदार्थांची पार्सल सेवा देणारे व्यवसाय सुरु ठेवता येतील

१०) **बांधकाम विषयक :** प्रतिबंधित क्षेत्राबाहेर बाहेरील मजूर न आणता कामाच्या जागेवर (In Situ) मजुरांची राहण्याची व्यवस्था होत असेल तर अशी बांधकामे आणि अपारंपरिक उर्जा प्रकल्पांची कामे करता येतील. पुणे मनपाने ज्या पूर्व पावसाळी कामांना, मेट्रोच्या कामांना, धोकादायक इमारतीबाबत करावयाची कारवाई तसेच पुरपरिस्थिती होऊ नये म्हणून ज्या कामांना पूर्व परवानगी देण्यात आलेली आहे, अशी कामे सुरु राहतील.

१०) **पथारी व्यावसायिक :** खालील नमूद रस्त्यांशिवाय अधिकृत पथारी व्यावसायिक यांना दररोज खालील अटीवर सकाळी ०९.०० ते संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत व्यवसाय करता येईल.

अ) **दोन (२) पथारी व्यावसायिकांमध्ये अंतर ५ मीटर ठेवावे व**

ब) हातमोजे व मास्क घालून विक्री करता येईल.

- शिवाजी रोड - पुणे मनपा - डेंगळे पुल - शनिवार वाडा ते जेधे चौक
- बाजीराव रोड - पुरम चौक - माडीवाले कॉलनी – शनिवार चौक – विश्रामबागवाडा - शनिवारवाडा.

- हडपसर - सोलापूर रोड - मगरपट्टा चौक ते गाडीतळ, गाडीतळ ते लक्ष्मी कॉलनी चौक ते शेवाळवाडी टोलनाका ते पुणे शहर हद्द पर्यंत तसेच गाडीतळ ते फुरसुंगी सासवड रोडने पुणे शहर हद्दपर्यंत.
- सातारा रोड – जेधे चौक - लक्ष्मीनारायण थिएटर, सिटी प्राईड, विवेकानंद पुतळा, धनकवडी फ्लाय ओव्हर ते कात्रज चौक, कात्रज चौक ते सातारा रोडने पुणे शहर हद्दपर्यंत.
- नगर रोड - येरवडा पर्णकुटी, गुंजन चौक, विमाननगर, वडगावशेरी, खराडी बायपास चौक ते वाघोली, तैलाची मोरी पुणे शहर हद्दपर्यंत.
- एअरपोर्ट रोड - गुंजन चौक - गोल्फ क्लब रोड - येरवडा पोस्ट ऑफिस - नागपूर चाळ - जैलरोड पौलीस चौकी - संजय पार्क - ५०९ चौक – एअरपोर्ट.
- सिंहगड रोड - दांडेकर पुल - पानमळा - रोहन कृतिका लगत, नाकोडा नगर – राजाराम पूल– विठ्ठलवाडी फुटपाथ - संतोष हॉल – आनंदनगर, माणिकबाग – वडगाव धायरी उड्डाणपुल, धायरी फाटा -धायरी शेवटचा बसस्टॉप.
- पौड रोड- खंडोजी बाबा चौक - स्वातंत्र्य चौक - नळ स्टॉप- कर्वेरस्ता फ्लायओव्हर- आनंदनगर- शास्त्री नगरकोथरुड बस डेपो- चांदणी चौक.
- जंगली महाराज रोड- संचेती चौक- झाशी राणी चौक-डेक्कन जिमखाना-संभाजी पुतळा - खंडोजी बाबा चौक.
- एफ.सी. रोड - खंडोजी बाबा चौक – गुडलक चौक - वैशाली हॉटेल - फर्गुसन कॉलेज- संत ज्ञानेश्वर पादुका चौक- शिवाजीनगर पोलीस स्टेशन.
- गणेशखिंड रोड-शिमला चौक - म्हसोबा चौक - सेंट्रल मॉल – शासकीय तंत्रनिकेतन- विद्यापीठ चौक- राजभवन- इंदिरा गांधी झोपडपट्टी- राजीव गांधी पूल औंध- पुणे शहर हद्दपर्यंत.

११) **सुरक्षा व सेवा व्यवस्था** : रहिवासी संकुल व कार्यालयांना व्यवस्थित ठेवण्यासाठी लागणाऱ्या सेवा व सुरक्षा पुरविणाऱ्या खाजगी संस्था सुरु राहतील .

हा आदेश आज दिनांक २३ जुलै २०२० रोजी माझ्या सही शिक्क्याने दिला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA • EST.1950 • पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन स्थ-१९५०

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका, पुणे

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

अनुसूची १

पुणे महानगरपालिकेतील सूक्ष्मप्रतिबंधित क्षेत्र (Micro Containment Zone)

टिप :- नव्याने समाविष्ट सूक्ष्मप्रतिबंधित क्षेत्र हे ``ठळक अक्षरामध्ये '' (bold type) दर्शविले आहे.

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | पर्वतीदर्शन परिसर १ | कसबा – विश्रामबागवाडा | पर्वती दर्शन चाळ नं. ६७, ७०, ९३, ९९, १०७, साईबाबा वसाहत परिसर |
| २ | टी.पी.स्किम ३, साने गुरुजी वसाहत | कसबा – विश्रामबागवाडा | टी.पी.स्किम ३, साने गुरुजी वसाहत, फा.प्लॉट नं. २८पै., २सी, २९पै., २९ए२ परिसर |
| ३ | पर्वती स.नं. १३३ दांडेकर पुल | कसबा – विश्रामबागवाडा | पर्वती स.नं. १३३ दांडेकर पुल वसाहत, आंबिल ओढा परिसर |
| ४ | सदाशिव पेठ राजेंद्र नगर मनपा कॉलनी | कसबा – विश्रामबागवाडा | राजेंद्र नगर मनपा कॉलनी सर्व इमारती |
| ५ | पर्वती दत्तवाडी गाडगीळ दवाखाना परिसर | कसबा – विश्रामबागवाडा | म्हात्रे पुल बाल शिवाजी मित्र मंडळ ते म्हसोबा चौक ते नदीपात्र, मदर तेरेसा उद्यान परिसर |
| ६ | शहर मध्यवर्ती भाग – **कसबा पेठ**, मंगळवार पेठ (पैकी), **सोमवार पेठ (पैकी)** | कसबा – विश्रामबागवाडा | **डॉ. आंबेडकर रस्ता (जुना बाजार चौक) पासून डॉ. आंबेडकर रस्त्याने जेथे बारणे रस्ता मिळतो तिथपर्यंत. तेथून दक्षिणेस बारणे रस्त्याने माणिक नाल्यापर्यंत. तेथून माणिक नाल्याने सदानंद नगर उत्तरेकडील रस्त्याने (बाबुराव सोनावणे रस्ता) नेहरू रस्त्यापर्यंत. तेथून दक्षिणेस नेहरू रस्त्याने नरपतगीर चौकापर्यंत. तेथून दक्षिणेस नेहरू रस्त्याने सि.स.नं. ३२४ सोमवार पेठ पर्यंत तेथून पश्चिमेस रस्त्याने सि.स.नं. ३४४ सोमवार पेठ पर्यंत तेथून दक्षिणेस रस्त्याने सि.स.नं. ४४४ सोमवार पेठ पर्यंत तेथून पश्चिमेस रस्त्याने समर्थ चौक (दारुवाला पुल) पर्यंत. तेथून पश्चिमेस रस्त्याने फडके हौद चौकातून पश्चिमेस रस्त्याने (लाल महाल) शिवाजी रस्त्यापर्यंत. तेथून उत्तरेस शिवाजी रस्त्याने रमा माधव चौकापर्यंत. तेथून पूर्वेस रस्त्याने कुंभारवाडा चौकातून पूर्वेस रस्त्याने डॉ. आंबेडकर रस्ता (जुना बाजार चौक) पर्यंत. यामधील क्षेत्र. मात्र बारणे रस्ता (सिंचन भवन समोरील), नेहरु रस्त्यावरील तसेच शिवाजी रस्ता लाल महाल ते फडके हौद चौक ते समर्थ चौक (दारूवाला पुल) ते सोमवार पेठ सि.स.नं. ४४४ पर्यंतच्या पूर्वेकडील आणि सि.स.नं. ४४४ सोमवार पेठ ते सि.स.नं. २८९ सोमवार पेठ पर्यंतच्या पश्चिमेकडील दुकाने वगळुन** |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| ७ | शहर मध्यवर्ती भाग – गणेश पेठ (पैकी), नाना पेठ (पैकी), भवानी पेठ(पैकी) | भवानी पेठ | लक्ष्मी रस्ता डुल्या मारुती पासून पूर्वेस लक्ष्मी रस्त्याने संत कबीर चौकापर्यंत. तेथुन दक्षिणेस पं. नेहरु रस्त्याने रामोशी गेट चौकापर्यंत. तेथुन पश्चिमेस रस्त्याने धर्मवीर डावरे चौकापपर्यंत.तेथुन उत्तरेस रस्त्याने अशोक चौकातुन उत्तरेस लक्ष्मी रस्त्यापर्यंत. तेथुन पश्चिमेस लक्ष्मी रस्त्याने डुल्या मारुतीपर्यंत. यामधील क्षेत्र.मात्र संत कबीर चौक ते डुल्या मारुती चौकापर्यंत लक्ष्मी रस्त्यावरील, नेहरु रस्त्यावरील तसेच **रामोशी गेट ते धर्मवीर डावरे चौकापपर्यंत** दुकाने वगळुन |
| ८ | शहर मध्यवर्ती भाग –नाना पेठ (पैकी), भवानी पेठ(पैकी) | ढोले पाटील रोड, भवानी पेठ | पं. नेहरु रस्त्यावरील नाना पेठ,सि.स.नं. ४०८ च्या उत्तरेकडील रस्त्याने (एथेल गार्डन समोरील) लक्ष्मी रस्त्यावरील महात्मा फुले चौकापर्यंत, तेथुन दक्षिणेस पंडीता रमाबाई रस्त्याने पद्मजी चौकातुन दक्षिणेस रस्त्याने भवानी माता मंदिरासमोरील रस्त्यावरील जुना मोटर स्टँडपर्यंत. तेथुन पूर्वेस रस्त्याने भवानी पेठ, सि.स.नं. ३८७ पर्यंत. तेथुन दक्षिणेस रस्त्याने पुना कॉलेजपर्यंत. तेथुन पश्चिम –दक्षिण रस्त्याने बीएसएनएल टेलिफोन एक्सचेंजपर्यंत. तेथुन पश्चिमेस रस्त्याने नागझरी नाल्यापर्यंत. तेथुन नागझरी नाल्याने उत्तरेस पं. नेहरु रस्त्यापर्यंत. तेथुन उत्तरेस पं. नेहरु रस्त्याने संत कबीर चौकातुन उत्तरेस पं. नेहरु रस्त्यावरील नाना पेठ,सि.स.नं. ४०८ पर्यंत. यामधील क्षेत्र. **मात्र नेहरु रस्त्यावरील दुकाने वगळुन** |
| ९ | शहर मध्यवर्ती भाग –गुरुवार पेठ (पैकी), महात्मा फुले पेठ (पैकी), घोरपडे पेठ (पैकी) | भवानी पेठ | गुरुवार पेठ, पानघंटी चौकातुन पूर्वेस रस्त्याने कृष्णाहट्टी चौकातुन पूर्वेस रस्त्याने महात्मा फुले पेठ,सि.स.नं. १८४ पर्यंत. तेथुन दक्षिणेस रस्त्याने मध्यवर्ती अग्निशामक केंद्रापर्यंत. तेथुन पूर्वेस रस्त्याने नागझरी नाल्यापर्यंत (पं.नेहरु रस्ता) तेथुन दक्षिणेस नागझरी नाल्याने फा.प्लॉट नं. २८५ पर्यंत. तेथुन दक्षिणेस रस्त्याने शंकरशेठ रस्त्यापर्यंत. तेथुन पश्चिमेस शंकरशेठ रस्त्याने जेधे चौकापर्यंत. तेथुन उत्तरेस शिवाजी रस्त्याने राष्ट्रभुषण चौक ते मामलेदार कचेरीच्या पूर्वेकडील रस्त्याने पानघंटी चौकापर्यंत. यामधील क्षेत्र. मात्र नेहरु रस्त्यावरील दुकाने वगळुन |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| १० | पुणे स्टेशन, ताडीवाला रोड | ढोले पाटील रोड | स्वीपर चाळ, भीम संघटना राजरतन, विश्वदीप तरुण मित्रमंडळ, मारुती मंदीर -१, बाल मित्रमंडळ, मारुती मंदीर-२, दुष्काळ वसाहत, संगीता वसाहत, कपिला डेअरी परिसर, लोकसेवा मित्रमंडळ उल्हासनगर, खड्डा वसाहत, लोकसेवा वसाहत. |
| ११ | घोरपडी, स.नं. ७१ पै., श्रीनाथ नगर, | ढोले पाटील रोड | घोरपडी श्रीनाथ नगर, स.नं. ७१ पै. लेन नं. १ ते ६ |
| १२ | हडपसर स.नं. १२४पै., २८२, २८३ पै. मुंढवा घोरपडी जवळील भिमनगर | ढोले पाटील रोड | हडपसर स.नं. १२४पै., २८२, २८२पै. मुंढवा घोरपडी जवळील भिमनगर |
| १३ | पर्वती शिवदर्शन १ | धनकवडी - सहकारनगर | रामभाऊ म्हाळगी पथाचे पश्चिमेकडील वसाहत |
| १४ | पर्वती शिवदर्शन २ | धनकवडी - सहकारनगर | रामभाऊ म्हाळगी पथाचे पूर्वेकडील वसाहत |
| १५ | पर्वती, अरण्येश्वर येथील तावरे कॉलनी | धनकवडी - सहकारनगर | पर्वती, अरण्येश्वर येथील तावरे कॉलनी परिसर |
| १६ | **पर्वती, स.नं. ५४, अण्णाभाऊ साठे नगर** | **धनकवडी - सहकारनगर** | **पर्वती, स.नं. ५४, अण्णाभाऊ साठे नगर** |
| १७ | **अरण्येश्वर, टांगेवाला कॉलनी** | **धनकवडी - सहकारनगर** | **अरण्येश्वर, टांगेवाला कॉलनी** |
| १८ | पर्वती, तळजाई वस्ती १ | धनकवडी - सहकारनगर | गोळवलकर गुरुजी पथाचे पश्चिमेकडील तळजाई वसाहत |
| १९ | **कात्रज, नवीन वसाहत** | **धनकवडी - सहकारनगर** | **कात्रज, नवीन वसाहत** |
| २० | बिबवेवाडी, कोठारी ब्लॉक्सजवळील बिबवेवाडी ओटा वसाहत | बिबवेवाडी | बिबवेवाडी, कोठारी ब्लॉक्सजवळील बिबवेवाडी ओटा वसाहत |
| २१ | **बिबवेवाडी, लोअर इंदिरानगर, के.के. मार्केट जवळ** | **बिबवेवाडी** | **बिबवेवाडी, लोअर इंदिरानगर, के.के. मार्केट जवळ** |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| २२ | बिबवेवाडी, स.नं. ६४५ पै., ६४६ पै., ६४७ पै., ६६६ पै.,अप्पर इंदिरानगर | बिबवेवाडी | बिबवेवाडी, स.नं. ६४५ पै., ६४६ पै., ६४७ पै., ६६६ पै., अप्पर इंदिरानगर, व्हीआयटी कॉलेज परिसर |
| २३ | बिबवेवाडी, अप्पर इंदिरानगर | बिबवेवाडी | बिबवेवाडी– स.क्र. ६४०पै., ६४८पै., ६५९पै., पैकी अप्पर इंदिरा नगर वसाहत, शिवरायनगर स.नं. ६५८ पै. |
| २४ | येरवडा प्रभाग क्र. ६ | येरवडा – कळस – धानोरी | येरवडा, प्र.क्र. 6 मधील अशोकनगर, भाटनगर, गणेशनगर, लक्ष्मीनगर, रामनगर, जयजवाननगर, पांडु लमाण वस्ती, यशवंतनगर, नेताजीनगर, नवी खडकी, गवळीवाडा, कामराजनगर, माणिकनगर, सुरक्षानगर, पर्णकुटी पायथा सुभाषनगर, शनीआळी, |
| २५ | **येरवडा, स.नं. २७पै., पंचशील नगर** | **येरवडा – कळस – धानोरी** | **येरवडा, स.नं. २७पै., पंचशील नगर** |
| २६ | **धानोरी, स.नं. १०९, ११० शांतीनगर, आळंदी रोड** | **येरवडा – कळस – धानोरी** | **धानोरी, स.नं. १०९, ११० शांतीनगर, आळंदी रोड** |
| २७ | **धानोरी, स.नं. ४०पै., एकतानगर** | **येरवडा – कळस – धानोरी** | **धानोरी, स.नं. ४०पै., एकतानगर** |
| २८ | घोरपडी ढोबरवाडी सरदार मुदलियार शाळेजवळ | वानवडी – रामटेकडी | घोरपडी ढोबरवाडी प्रभाग क्र. २८ सरदार मुदलियार शाळेजवळील परिसर |
| २९ | हडपसर, लक्ष्मीनगर रेल्वे लाईनजवळ | वानवडी – रामटेकडी | हडपसर, लक्ष्मीनगर प्रभाग क्र. २५ रेल्वे लाईन जवळील परिसर |
| ३० | हडपसर, गोसावीवस्ती, वैदूवाडी | वानवडी – रामटेकडी | वैदूवाडी, रिद्धी सिद्धी बिल्डींग परिसर, लक्ष्मी माता मंदिर परिसर, डायमंड बेकरी परिसर, ओंकार हॉस्पिटल परिसर, सिल्व्हर टॉवर परिसर |
| ३१ | हडपसर, गोसावी वस्ती | वानवडी – रामटेकडी | हडपसर, स.नं. १०६ए पै, गोसावी वस्ती, पुणे सोलापुर रस्ता कॅनॉललगत परिसर, **शंकर मठ वसाहत** |
| ३२ | **वानवडी गावठाण** | **वानवडी – रामटेकडी** | **वानवडी गावठाण** |
| ३३ | वानवडी, एस.आर.पी.एफ. | वानवडी – रामटेकडी | वानवडी एसआरपीएफ क्र. १ व २, नानावटीनगर |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| ३४ | हडपसर, सय्यदनगर २ | वानवडी – रामटेकडी | आशियाना हॉल परिसर, गल्ली नंबर ८अ ते २८अ, आशाबी रसूल मस्जिद परिसर |
| ३५ | कोंढवा खुर्द भाग्योदयनगर | वानवडी – रामटेकडी | गणेश चौक ते डीएडी सिमाभिंत, **नावाजीश पार्क, कॉलम चौक** |
| ३६ | कोंढवा खुर्द साई बाबा नगर ते तांबोळी बाजार | वानवडी – रामटेकडी | मिठानगर परिसर, महाराष्ट्र ट्रस्ट एज्युकेशनल ट्रस्ट कॉलेज एज्युकेशन ट्रस्ट मिठानगर गल्ली क्रमांक १ ते १८, भाग्योदय नगरचा काही भाग, साई बाबा नगर ते तांबोळी बाजार, गगन इम्राल्ड सोसायटी परिसर, अल नूर मस्जिद परिसर, अक्षर धाम सोसायटी परिसर, माउंट हेवन सोसायटी परिसर, |
| ३७ | कोंढवा खुर्द मिठानगर | वानवडी – रामटेकडी, कोंढवा – येवलेवाडी | पूर्वेस: भैरोबा नाला व कोंढवा रस्ता, पश्चिमेकडील युनिटी पार्क को. ऑप. सोसायटी व रस्ता, उत्तरेस : अशोका म्युज सोसायटी, दक्षिणेस : अशरफनगर परिसर |
| ३८ | **शिवाजीनगर गावठाण पैकी** | **शिवाजीनगर – घोलेरोड** | **शिवाजीनगर गावठाणाचा काही भाग. मात्र जंगली महाराज रस्त्यावरील दुकाने वगळून** |
| ३९ | शिवाजीनगर, पांडवनगर, हेल्थ कॅम्प, वडारवाडी | शिवाजीनगर – घोलेरोड | शिवाजीनगर, पांडवनगर, हेल्थ कॅम्प, वडारवाडी, कुसाळकर बंगला परिसर, अमर मित्र मंडळ जिम परिसर |
| ४० | शिवाजीनगर, पांडवनगर, गुंजाळवाडी | शिवाजीनगर – घोलेरोड | शिवाजीनगर, पांडवनगर, गुंजाळवाडी परिसर |
| ४१ | शिवाजीनगर, जनवाडी, गोखलेनगर | शिवाजीनगर – घोलेरोड | हिरवी चाळ, लाल चाळ, पावन हौसिंग सोसायटी, चाळ नं. ९०, ९५ भिमदिप सोसायटी, ओटा घर, पुरग्रस्त वसाहत, अरुणा चौक परिसर, नवनाथ सोसायटी, विनय–वसंत सोसायटी, जनता वसाहत, सोमेश्वर मित्र मंडळ चौक परिसर, पाच पांडव सोसायटी, पी.एम.सी. कॉलनी, जनवाडी परिसर |
| ४२ | शिवाजी नगर, क्रांतिवीर चाफेकर नगर, गणेश खिंड रोड | शिवाजीनगर – घोलेरोड | शिवाजी नगर, क्रांतिवीर चाफेकर नगर, गणेश खिंड रोड, |
| ४३ | शिवाजीनगर, वाकडेवाडी संभाजीनगर, पी.एम.सी. कॉलनी | शिवाजीनगर – घोलेरोड | शिवाजीनगर, वाकडेवाडी संभाजीनगर, पी.एम.सी. कॉलनी चाळ नं. १० |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| ४४ | संगमवाडी टी.पी. स्किम फा. प्लॉट क्र. ७ व ८, मुळा रोड, आर्दशनगर | शिवाजीनगर – घोलेरोड | संगमवाडी टी.पी. स्किम फा. प्लॉट क्र. ७ व ८, मुळा रोड, आदर्शनगर ते अरगडे कॉर्नर |
| ४५ | औंध, स.नं. ७८पै., ७९पै., ८०पै., इंदिरा वसाहत | शिवाजीनगर – घोलेरोड | औंध, स.नं. ७८पै., ७९पै., ८०पै., इंदिरा वसाहत मारुती मंदिरामागे |
| ४६ | येरवडा, जयप्रकाश नगर व गांधीनगर | नगररोड – वडगावशेरी | स.नं. १०३ येरवडा जयप्रकाशनगर, गांधीनगर |
| ४७ | **वडगाव शेरी, स.नं. ३० पै., विकफिल्ड वसाहत रामवाडी** | **नगररोड – वडगावशेरी** | **वडगाव शेरी, स.नं. ३० पै., विकफिल्ड वसाहत रामवाडी** |
| ४८ | **लोहगाव, स.नं. २४२पै., बर्मा सेल, इंदिरानगर** | **नगररोड – वडगावशेरी** | **लोहगाव, स.नं. २४२पै., बर्मा सेल, इंदिरानगर** |
| ४९ | पर्वती स.नं. १३२, राजीव गांधी नगर सिंहगड रोड | सिंहगड रोड | गदादे पाटील वाडा, निलायम पुलाचे पश्चिम बाजु राजीव गांधी नगर, सिंहगड रोड व कॅनॉल मधील वस्ती |
| ५० | पर्वती स.नं. १३०, दांडेकर पुल, सिंहगड रोड | सिंहगड रोड | पर्वती स.न. १३०, दांडेकर पुलाची पश्चिम बाजु आंबिल ओढा, दक्षिण बाजु फरशी पुल रस्त्याच्या पूर्वेस सिंहगड रोडचे उत्तर बाजु दांडेकर पुल वसाहत |
| ५१ | पर्वती, पानमळा वसाहत | सिंहगड रोड | पर्वती पानमळा वसाहत |
| ५२ | पर्वती जनता वसाहत | सिंहगड रोड | पर्वती पायथा पुलाचे पश्चिम भागातील कॅनॉल व पर्वती डोंगर मधील जयभवानीनगर गल्ली नं. १ ते ८,जनता वसाहत गल्ली नं. १ ते ४७, ७६ ते ८३ |
| ५३ | पर्वती, टी.पी.स्कीम ३, फा.प्लॉट ५४५पै. गणेश मळा येथील समता नगर, गणपत नगर, गांधीनगर, शाहूनगर, नेहरुनगर | सिंहगड रोड | पर्वती, टी.पी.स्कीम ३, फा.प्लॉट ५४५पै. गणेश मळा येथील समता नगर, गणपत नगर, गांधी नगर, शाहू नगर, नेहरू नगर |
| ५४ | **मोहम्मदवाडी, तावडे वस्ती** | **हडपसर – मुंढवा** | **मोहम्मदवाडी, तावडे वस्ती** |
| ५५ | फुरसुंगी, भेकराईनगर | हडपसर – मुंढवा | फुरसुंगी स.नं. १७६, १७७ भेकराईनगर, ढमाळवाडी परिसर |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| ५६ | **फुरसुंगी, स.नं. २१५, गंगानगर** | **हडपसर – मुंढवा** | **फुरसुंगी, स.नं. २१५, गंगानगर** |
| ५७ | हडपसर स.नं. १८पै., गोंधळेनगर | हडपसर – मुंढवा | हडपसर स.नं. १८पै., गोंधळेनगर, शंकर मंदिराजवळील परिसर |
| ५८ | हडपसर, स.नं. १३ पै. सातववाडीमधील काही भाग | हडपसर – मुंढवा | हडपसर, स.नं. १३ पै. बनकर कॉलनी |
| ५९ | हडपसर, स.नं. १६५ पै. माळवाडी आदर्श वसाहत, काळूबाई वसाहत | हडपसर – मुंढवा | हडपसर, स.नं. १६५ पै. माळवाडी आदर्श वसाहत, काळुबाई वसाहत |
| ६० | **हडपसर, स.नं. १६५पै., माळवाडी, जनता वस्ती, कामठे वस्ती** | **हडपसर – मुंढवा** | **हडपसर, स.नं. १६५पै., माळवाडी, जनता वस्ती, कामठे वस्ती परिसर** |
| ६१ | हडपसर, साडेसतरानळी, गणेशनगर | हडपसर – मुंढवा | हडपसर, साडेसतरानळी, गणेशनगर परिसर |
| ६२ | **कोंढवा बुद्रुक गावठाणपैकी** | **कोंढवा – येवलेवाडी** | **कोंढवा बुद्रुक गावठाण** |
| ६३ | **बिबवेवाडी, स.नं. ६५१पै., ६५९पै., राजीव गांधी नगर** | **कोंढवा – येवलेवाडी** | **बिबवेवाडी, स.नं. ६५१पै., ६५९पै., राजीव गांधी नगर** |
| ६४ | बिबवेवाडी, चैत्रबन वसाहत लेन नं. १३, १४, १५ | कोंढवा – येवलेवाडी | बिबवेवाडी, चैत्रबन वसाहत, लेन नं. १३, १४, १५ |
| ६५ | **धनकवडी, बालाजीनगर, पवार हॉस्पिटल परिसर** | **कोंढवा – येवलेवाडी** | **धनकवडी, स.नं. २० पै., २२ पै.,२३ पै., बालाजीनगर, पवार हॉस्पिटल परिसर** |
| ६६ | एरंडवणा, खिलारे वस्ती , प्लॉट नं. १५, | वारजे – कर्वेनगर | एरंडवणा, टी.पी. स्कीम १ – फा. प्लॉट नं. १५पै., २४पै., २६पै., खिलारे वस्ती परिसर |
| ६७ | **एरंडवणा, खिलारे वस्ती , प्लॉट नं. १७,** | **वारजे – कर्वेनगर** | **एरंडवणा, खिलारे वस्ती , प्लॉट नं. १७, थरकुडे दवाखाना परिसर** |
| ६८ | एरंडवणा, पंडीत जवाहरलाल नेहरु वसाहत | वारजे – कर्वेनगर | एरंडवणे, पंडीत जवाहरलाल नेहरु वसाहत, एस.एन.डी.टी. कॉलेज समोर, कर्वे रस्त्याजवळ |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| ६९ | एरंडवणा, स.नं. १०पै., ११पै., १२पै., गणेशनगर | वारजे – कर्वेनगर | एरंडवणा, स.नं. १०पै., ११पै., १२पै., गणेशनगर |
| ७० | कोथरुड हॅपी कॉलनी जवळील गोसावी वस्ती | वारजे – कर्वेनगर | कोथरुड हॅपी कॉलनी जवळील गोसावी वस्ती |
| ७१ | कर्वेनगर, कामना वसाहत, मावळे अळी परिसर | वारजे – कर्वेनगर | कर्वेनगर, कामना वसाहत, मावळे अळी परिसर |
| ७२ | कर्वेनगर, श्रमिक वस्ती, वडार वस्ती | वारजे – कर्वेनगर | कर्वेनगर, श्रमिक वस्ती, वडार वस्ती |
| ७३ | कर्वेनगर – हिंगणे बु।।, स.नं. ५३ पै. वडार वस्ती | वारजे – कर्वेनगर | हिंगणे बु।।, स.नं. ५३ पै. वडार वस्ती कर्वेनगर |
| ७४ | वारजे, रामनगर | वारजे – कर्वेनगर | वारजे, रामनगर वसाहत, खानवस्ती, शिवाजी चौक, वेताळबुआ चौक, ठोंगरवाडी, वैदुवाडी, |
| ७५ | कोथरुड, डहाणुकर कॉलनी, लक्ष्मीनगर लेन नं. ४ व ८ | कोथरुड – बावधन | कोथरुड, डहाणुकर कॉलनी, लक्ष्मीनगर, लेन नं. ४ व ८ |
| ७६ | कोथरुड, पोस्टमन कॉलनी, शास्त्रीनगर, पी.एम.सी. कॉलनी, सागर कॉलनी, न्यू लोकमान्य वसाहत | कोथरुड – बावधन | कोथरुड, स.नं. ८३ पै, पोस्टमन कॉलनी, स.नं. १६४पै., १६५पै., ८४पै. पी.एम.सी. कॉलनी,कृष्णा नगर, सागर कॉलनी शास्त्रीनगर पौड रस्ता डाव्या बाजुचा परिसर, न्यू लोकमान्य वसाहत |
| ७७ | कोथरुड, पौड रोड जयभवानीनगर | कोथरुड – बावधन | कोथरुड, पौड रोड, जयभवानीनगर संपूर्ण परिसर |
| ७८ | कोथरूड, स.नं. १२०पै., किष्किंधानगर | कोथरुड – बावधन | कोथरूड, स.नं. १२०पै., किष्किंधानगर |
| ७९ | कोथरूड, स.नं. १११, ११२ सुतारदरा | कोथरुड – बावधन | कोथरूड, स.नं. १११, ११२ सुतारदरा |
| ८० | एरंडवणा स.नं. ४४पै. केळेवाडी मोरे श्रमिक वसाहत | कोथरुड – बावधन | एरंडवणा स.नं. ४४पै. केळेवाडी, मोरे श्रमिक वसाहत परिसर |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| ८१ | एरंडवणा स.नं. ४४पै. केळेवाडी मामासाहेब मोहोळ शाळेची पूर्व बाजूचा परिसर, **हनुमाननगर** | कोथरुड – बावधन | एरंडवणा स.नं. ४४पै. केळेवाडी, राजीव गांधी वसाहत, **हनुमाननगर**, गणपती मंदिर परिसर, |
| ८२ | एरंडवणा, स.नं. ४४पै., मेगा सिटी इमारत क्र. ३/४ | कोथरुड – बावधन | एरंडवणा स.नं. ४४पै., पौड फाटा, मेगा सिटी इमारत क्र. ३/४ (एस.एन.डी.टी. कॉलेज जवळ) |
| ८३ | बोपोडी, आंबेडकर नगर वसाहत, भाऊ पाटील रस्ता | औंध – बाणेर | बोपोडी, आंबेडकर नगर वसाहत, भाऊ पाटील रस्ता |
| ८४ | बोपोडी, स.नं. २६पै | औंध – बाणेर | बोपोडी, स.नं. २६पै मनपा शाळेलगतचा भाग |
| ८५ | बोपोडी, स.नं. २५पै., म्हसोबा मंदिर परिसर | औंध – बाणेर | बोपोडी, स.नं. २५पै., म्हसोबा मंदिर परिसर |
| ८६ | बोपोडी, स.नं. २४ब पै., २५पै. पवळे चाळ परिसर | औंध – बाणेर | बोपोडी, स.नं. २४, २५पै. पवळे चाळ, सिद्धार्थ नगर, सम्राट नगर, बहिरट चाळ परिसर |
| ८७ | बोपोडी, ॲम्युनिशियन फॅक्ट्री रेल्वे लाईनलगत भोईटे वस्ती परिसर | औंध – बाणेर | बोपोडी, ॲम्युनिशियन फॅक्ट्री रेल्वे लाईनलगत भोईटे वस्ती, भारतनगर, इंदिरानगर |

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका